नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०३/२०२६ (शनिवार )

## मा. मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या १५० दिवसांचा ई –गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमामध्ये पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण यांची महाराष्ट्रातून दुसऱ्या क्रमांकाने निवड झाल्याबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतुन प्रशासनाला गतीमानता येण्यासाठी 'क्षेत्रीय कार्यालयांसाठी १५० **दिवसांचा ई–गव्हर्नन्स सुधारणा** हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांचा समावेश होता. या १५० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेचे मुल्यमापन हे **'भारतीय गुणवत्ता परिषद'** (Quality Council Of India) या संस्थे मार्फत करण्यात आले.त्यामध्ये पोलीस विभागा अंतर्गत संपुर्ण महाराष्ट्र राज्यातुन सर्वोत्तम ५ पोलीस अधीक्षक कार्यालय यांची निवड करण्यात आली असुन **पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण ने संपुर्ण राज्यातुन २०० पैकी १६१ गुण मिळवुन व्दितीय क्रमांक पटकावला. यापुर्वी सुध्दा मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमामध्ये नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयाने व्दितीय क्रमांक मिळविला होता. पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण हे राज्यातील एकमेव घटक आहे ज्यांनी १०० आणि १५० दिवसांच्या दोन्ही ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमामध्ये मध्ये पुरस्कार प्राप्त केला आहे.**

या विशेष मोहिम अंतर्गत नागपुर ग्रामीण पोलीसांनी १) कार्यालयाचे संकेतस्थळ , २) आपले सरकार प्रणाली, ३) ई–ऑफीस, ४) कार्यालयाचा डॅशबोर्ड, ५) व्हॉट्सॲप चॅटबॉट आणि ६) अभिनव प्रकल्प अशा विविध मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करून या उपक्रमा

अंतर्गत देण्यात आलेले उद्दिष्टे १०० टक्के पुर्ण करून पारदर्शक, लोकाभिमुख आणि आधुनिक पोलिसींगच्या दिशेने महत्वपुर्ण कामगिरी केली आहे.

**आज दिनांक २८/०३/२०२६ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे पार पडलेल्या बक्षीस वितरण समारंभात मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि त्यांच्या सर्व चमुचे हार्दीक अभिनंदन केले आणि मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी करीता प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले.**

सदर समारंभात मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. श्री अशिष शेलार, माहीती व तंत्रज्ञान, संस्कृतीक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. श्री राजेश अग्रवाल, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य आणि मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



# अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद १६ गोवंश जनावरांची सुटका,वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक २८/०३/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा नागपूर रोडने अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भंडारा ते नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वर झुल्लर फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप क्र. एम एच ३५/ए जे २९४३ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा ईशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये लहान मोठे एकुण १६ गोवंश जनावरे मिळुन आले. वाहनातील जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, पायाला आणि शिंगाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप क्र. एम एच—३५ ए जे—२९४३ किंमती ४,००,०००/— रूपये, १६ गोवंश जनावरे किंमती १,६०,०००/— रूपये असा एकुण ५,६०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपी बोलेरो पिकअप क्र. एम एच—३५/ए जे —२९४३ चा चालक व मालक यांचेविरूध्द कलम ११(१) (ड), (ई), (फ) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, कलम ५(अ) (१) (२),९ महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनामधील ११ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २८/०३/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, गोवंश जनावरांची कत्तलीकरीता पिकअप मधुन वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी माथनी शिवारात भंडारा ते नागपूर रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एमएच—४० सी टी— ३०८४ हे मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **आरोपी चालक १) अर्पीत किरण डाकरे, वय २२ वर्ष, रा. वरठी, ता. मोहाडी, जि. भंडारा आणि क्लिनर आरोपी २) अमन पुरूषोत्तम बांते, वय २६ वर्ष, रा. चिचखेडा, ता. मोहाडी, जि. भंडारा** हे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात ११ गोवंश जनावरे मिळुन आले. वाहनातील जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन पायाला आणि शिंगाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप क्र. एमएच—४०/सी टी—३०८४ किंमती ६,००,०००/— रूपये, ११ गोवंश जनावरे किंमती १,१०,०००/— रूपये असा एकुण ७,१०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी दोन्ही आरोपी विरूध्द कलम ११(१) (ड), (ई), (फ) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, सहकलम ५(अ) (१), ९ महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनामधील २० जनावरांची (हेले) सुटका, बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक २६/०३/२०२६ रोजी बुटीबोरी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नागपूर येथुन बुटीबोरी मार्गे अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नागपूर ते बुट्टीबोरी हायवे रोड, ग्राम मोहगाव जवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान भारत बेंझ कंटेनर क्रं के. ए ०१/ए. एम ८५३६ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता आरोपी चालक १) नशिम हारून अहमद, वय ३४ वर्ष, रा. ग्राम. घासडा तह. नुहु जि. मेवात राज्य, हरीयाणा क्लीनर नामे २) हैदरअली अब्दुल रहीम, वय ३० वर्ष, रा. ग्राम. घासडा, तह. नुहु, जि. मेवात, राज्य हरीयाना अशी माहीती त्यांना प्राप्त झाली. आरोपी क्रं ३) ईस्लाम खुदाबक्ष बंजारे, वय ४० वर्ष, रा. कैराना आर्यपुरी, जि. शामली राज्य (उत्तरप्रदेश) आणि क्रं ४) प्रताप ब्रजमोहन निंदु, वय २५ वर्ष, रा. बुटराडा, ता. बनत, जि. शामली राज्य (उत्तरप्रदेश) हे सुध्दा वाहनात मिळुन आले. आरोपींना वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन माल आरोपी क्रं ५) मोहम्मद हमजा फैजल, रा. पटटीक्कदन हाउस, मनदमकुंदु नेममीनह मल्लप्पुरम, थाचीगंनदम राज्य केरळ अशी माहीती प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष वाहने तपासली असता वाहनामध्ये २० नग हेले मिळुन आली. वाहनातील जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून कंटेनर के. ए —०१ ए. एम— ८५३६ किंमती २५,००,०००/—रूपये २० नग हेले प्रत्येकी अंदाजे ३०,०००/— रूपये, एकुण किंमती ६,००,०००/—रूपये असा एकुण ३१,००,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपी क्रं १) ते ५) यांचेविरूध्द कलम ११(१) (ड), (ई), (एफ) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, कलम ६, ९ (अ) महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६, सहकलम ६६/१९२ मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
# वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक २७/०३/२०२६ रोजी वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, वडोदा रोडने भुगावकडे ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी वडोदा येथील भुगाव जाणारा स्मशान घाट रोडवर नाकाबंदी केली असता विनानंबरचा सिल्व्हर रंगाचा ट्रॅक्टर आयसर मॉडेल त्याला जोडलेली विनानंबरची ट्रॉली मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टरचा चालक नामे **लिलाधर पतरू गायकवाड, वय ५३ वर्षे, रा. भुगाव त. कामठी, जि. नागपूर** हा मिळुन आला. पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) विनानंबरचा सिल्व्हर रंगाचा ट्रॅक्टर आयसर मॉडेल नं. ४८५ व विनानंबरची ट्रॉली किंमती ३२५,०००/—रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये असा एकुण ३,३०,०००/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४, सहकलम ५०/१७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक
# नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक २७/०३/२०२६ रोजी फिर्यादी राजेंद्र गोमाजी वानखेडे, वय ४६ वर्षे, रा. वार्ड क्र. ५, खैरगाव ता. नरखेड यांनी पोलीस स्टेशन नरखेड येथे तक्रार दिली की, दिनांक २६/०३/२०२६ यातील **आरोपी नामे १) रविंद्र रामराव चौधरी, वय ४५ वर्षे, २) जितेंद्र बाबुराव वानखडे, वय ४१ वर्षे, ३) कार्तीक चौधरी, वय २२ वर्षे, तिन्ही**

**रा. खैरगाव** यांनी संगनमत करुन रविंद्र चौधरी याचे सोबत फिर्यादी राजेंद्र गोमाजी वानखेडे यांचे असलेल्या आपसी मतभेदाचे कारणावरून तिरूपती बारमध्ये येवून फिर्यादीस लोखंडी शस्त्र आणि लाकडी भरीव दांडयाने मारहाण करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

**पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०९, ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करून आरोपी नामे १) रविंद्र रामराव चौधरी, वय ४५ वर्षे, २) जितेंद्र बाबुराव वानखडे, वय ४१ वर्षे, ३) कार्तीक चौधरी, वय २२ वर्षे, तिन्ही रा. खैरगाव यांना तात्काळ ताब्यात घेत दिनांक २७/०३/२०२६ रोजी अटक केली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

दिनांक २७/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, तसेच इतर साहित्य असा एकुण ५२४५६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वेलतूर** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) सचिन बिठोबा नागपुरकर, वय ४९ वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी नंदकिशोर पवार, वय ३० वर्ष, रा. पारधी बेडा चांपा, ता. उमरेड २) ०२ महिला आरोपी याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) राहुल किसनरावजी मोरे, वय ३५ वर्ष, रा. पेठ, मुक्तापुर ता. नरखेड २) गोपाल महादेव खरपुरीया, वय ५६ वर्ष, रा. झोलवाडी, ता. नरखेड ३) नितीन निंळकठ नारनवरे, वय. ४२ वर्ष, रा. रोहना, ता. नरखेड, जि. नागपुर ४) रुपचंद आपाजी पवार, वय २९ वर्ष, रा. घोगरा, ता. नरखेड, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे निलेश प्रेमराज तागडे, वय २३ वर्ष, रा. येनवा काटोल, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद**, पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे अनिल विठोबाजी सरवरे, वय ४६ वर्षे, रा. सावरगाव याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन**

**केळवद** येथे आरोपी नामे शेषराव लक्ष्मण शिंदे, वय ६५ वर्ष, रा. सातनूर, ता. जि. पांढूर्णा म. प्र. याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) रावजी मोहन परतेती, वय ३५ वर्ष, रा. सिंदेवानी, त. सावनेर, जि. नागपुर २) महिला आरोपी याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) विष्णु भोजराम मारबते, वय ४५ वर्ष, रा. कोटगाव, ता. मौदा २) मिथुन शेषराव वाघमारे, वय ३६ वर्ष, रा. आजनगाव मौदा याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे पंडीत गेंदलाल सावरकर, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र ३, खापरी मोरेश्वर, ता. हिंगना, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा एकुण १८ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १८ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण ४०८ लिटर मोहाफुल गावठी दारू, १०६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, ६२१० मिली देशी दारू तसेच इतर साहित्य असा एकुण ५२४५६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ७४५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २८/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७४५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १७ आरोपी, पोलीस स्टेशन वडोदा येथे ११ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३७ आरोपी अशा एकुण १९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने